# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### राज्यातील मराठवाडा विभागात जलसंवर्धन करण्याबाबत

**(१) १९१८७ (०४-०८-२०२३) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठवाडा विभागात धरणांची पुरेशी संख्या असूनही सिंचन क्षेत्र कमी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे कालव्याने पाणी वितरण होत नसल्याने १० लाख पंपाद्वारे उपसा सिंचन सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे भूजल पातळी खालावत असल्यामुळे शासनाने मराठवाड्यात जलसंवर्धनाबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१९-०९-२०२४) :** (१)मराठवाडा विभागात जलसंपदा विभागांतर्गत एकूण ११ मोठे, ७८ मध्यम व ८६० लघु प्रकल्प असे एकूण ९४९ प्रकल्प आहेत. या सर्व प्रकल्पांची एकूण प्रकल्पीय सिंचन क्षमता १३८९५२३ हेक्टर एवढी असून सद्य:स्थितीत एकूण निर्मित सिंचन क्षमता ११८१२७५ हेक्टर एवढी आहे. या सर्व प्रकल्पांवर कालव्यांद्वारे व उपसाद्वारे सिंचन होते. तसेच मृद व जलसंधारण विभागाच्या अंतर्गत साठवण /पाझर तलावाच्या मध्यमांतून एकूण ३१३४२ प्रकल्पातून जलसंवर्धनाची कामे झाली असून त्याद्वारे ४८३६३६ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे.

(२) होय, अंशतः खरे आहे.

यात्यतिरिक्त सिंचन क्षेत्र निर्मीती करण्यात प्रकल्पांच्या कालवे वितरण प्रणालीव्दारे लाभधारक शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी देण्यात येते. याव्यतिरिक्त थेट जलाशयाच्या उपशाद्वारे लाभधारक पाणी उपसा परवाने दिलेले असून त्याद्वारे उपसा सिंचन करण्यात येते तसेच प्रकल्पावरील दोन पाणी पाळी आर्वतनामध्ये २० ते २५ दिवसाचा कालवधी असतो, त्यामुळे भुधारकांना उभ्या पिकासाठी पाण्याची आवश्यकता निर्माण होत असते. ही आवश्यकता भुधारक त्यांनी वैयक्तीक घेतलेल्या विहिरीव्दारे पूर्ण

करतात. हा पाणी वापर संयुक्त पाणी वापरच असतो. तसेच संकल्पनेनुसार उच्च पातळी बंधारे, कोल्हापुरी बंधारे व साठवण तलावातून पंपाद्वारे उपसा होतो व त्यातून सिंचन होते.
(३) पाणी नाश टाळणे, टेल टू हेड सिंचन करणे इत्यादी बाबत जलजागृती सप्ताहामार्फत गावोगावी जलसंवर्धन संबंधित विविध बैठक, गावोगावी कार्यक्रम घेऊन जागृती करण्यात येते. तसेच पाण्याचा काटकसरीने वापर करणेबाबत लाभधारकास सुक्ष्म सिंचन वाढवण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येते. जलसंवर्धन करण्याच्या अनुषंगाने धरण दुरुस्ती व सिंचनासाठी कालव्याच्या देखभाल दुरुस्तीची कामे निधी उपब्धतेनुसार करण्यात येतात. तसेच जलसंधारण विभागाकडून चालु आर्थिक वर्षात १४०५ प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून याद्वारे २७९८५ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण होणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयांमधील रेन हार्वेस्टिंग प्रकल्पांबाबत

**(२) २१२०३ (०५-०१-२०२४) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पावसाच्या पाण्याचा पुनर्वापर व्हावा तसेंच भूजलपातळी वाढून पाणी टंचाई कमी करण्यासाठी सातारा जिल्ह्यातील ४० महाविद्यालयांमध्ये रेन हार्वेस्टिंग प्रकल्प उभारण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यावर्षी पाऊस अत्यंत कमी प्रमाणात पडल्यामुळे भूजलपातळी खालावल्यामुळे महाविद्यालयातील बोअरवेल बंद पडले असून महाविद्यालयातील उद्यानांना तसेच अंतर्गत वापरासाठी टँकरचे पाणी मागवावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पाऊस अत्यंत कमी पडल्यामुळे भूजलपातळी घटली असून कूपनलिका बंद पडल्यामुळे संपूर्ण खर्चांबरोबर आता टँकरद्वारे पाणी विकत घ्यावे लागत असल्यामुळे महाविद्यालय व्यवस्थापनावर आर्थिक भार येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनानें चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महाविद्यालय व्यवस्थापनावरील आर्थिक बोजा कमी करण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२०-०८-२०२४) :** (१)होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अकृषी विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील संगणकशास्त्र व इलेक्ट्रॉनिक विषयांना अनुदान मिळण्याबाबत

**(३) २१२९४ (०५-०१-२०२४) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अकृषी विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयातील संगणकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक व शारिरीक शिक्षण या विषयास अनुदान देण्याबाबत दिनांक २८ जुलै, २०११ रोजीच्या मंत्री मंडळ बैठकीत निर्णय घेऊन शासनाने दिनांक ४ एप्रिल, २०१२ रोजी तत्संदर्भातील शासन निर्णय निर्गमीत केला परंतु बऱ्याच महाविद्यालयांमध्ये संगणकशास्त्र व इलेक्ट्रॉनिक या विषयाचे अनुदान प्राप्त झालेले नाही तसेच सन १९९३ पासून काही महाविद्यालयात वर्कलोडनुसार तुकड्यांना मान्यता दिल्या असून, त्यांनाही अद्याप अनुदान दिलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००१ पुर्वी मान्यता असलेल्या महाविद्यालय व लातुर/उस्मानाबाद जिल्ह्यातील भुंकपग्रस्त भागातील महाविद्यालयांना अद्याप अनुदान पात्र केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संगणकशास्त्र व इलेक्ट्रॉनिक विषयास अनुदान, तुकडी अनुदान व २००१ पुर्वीच्या महाविद्यालयांना अनुदान पात्र करणे तसेच भुकंपग्रस्त भागातील महाविद्यालयांना अनुदान पात्र करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१८-१०-२०२४) :** (१) राज्यातील अकृषी विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयातील संगणकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स व शारिरीक शिक्षण या विषयास अनुदान मंजूर करणेबाबतचा शासन निर्णय दिनांक ०४/०४/२०१२ रोजी निर्गमित केलेला आहे. सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ प्रमाणे संगणकशास्त्र – १००, परिशिष्ट-ब प्रमाणे इलेक्ट्रॉनिक्स – १३ व परिशिष्ट-क प्रमाणे शारिरीक शिक्षण – ४१ महाविद्यालयांतील विषयांना अनुदान तत्वात बदल करून एकूण १५४ महाविद्यालयातील वाणिज्य व विज्ञान शाखेतील संगणकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स व शारिरीक शिक्षण विषयासाठी माहे ऑक्टोंबर, २०१० च्या विद्यार्थी संख्येवर एकूण २६१ पदे शासन निर्णयाच्या दिनांकापासून १००% अनुदानावर आणण्यास शासनाने मंजूरी दिली आहे.

तद्नंतर शासन निर्णय दिनांक १२/०७/२०१९ अन्वये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांच्या अंतर्गत ५ महाविद्यालयांतील संगणकशास्त्र विषयाची एकूण १२ पदे अनुदानावर आणण्यास शासनाने मंजूरी दिली आहे.

राज्यात दिनांक २४/११/२००१ पुर्वी काही महाविद्यालयांना कायम विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेली आहे. तसेच, शासन निर्णय दिनांक ०४/०४/२०१२ अन्वये संगणकशास्त्र विषयास अनुदान मंजूर करताना जे निकष विचारात घेण्यात आले होते त्या निकषांची पुर्तता करीत नसल्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित १४ महाविद्यालयातील विज्ञान शाखेंतर्गत बी.सी.एस. तथा बी.एस्सी संगणकशास्त्र या अभ्यासक्रमास अनुदान मंजूर करणेबाबत प्रस्ताव शासन पत्र दिनांक २३/०३/२०१७ अन्वये अमान्य करण्यात आलेला आहे. सदर आदेशाविरूध्द संबंधित अध्यक्ष यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका क्र. ३८४९/२०१ सादर केली असून सदर प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

सन १९९३ पासून काही महाविद्यालयात कार्याभारानुसार तुकड्यांना मान्यता दिल्या आहेत. तथापि, त्यांना अद्यापही अनुदान दिलेले नाही असा प्रस्ताव विभागात आढळून आलेला नाही.

(२) व (३) सद्य:स्थितीत कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्याचे धोरण कायम आहे.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## राज्यात नवीन २९ पोलीस ठाणी उभारण्याच्या प्रस्तावाबाबत

**(४) २१५९९ (०४-०१-२०२४) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कोल्हापूर, ठाणे, नवी मुंबई, पालघर जिल्हयांचा वाढता विस्तार आणि वाढती गुन्हेगारी लक्षात घेता राज्यात नवीन २९ पोलीस ठाणे उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधिन असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरांमधील गुन्हयांत होणारी वाढ लक्षात घेता कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी राज्यात नवीन २९ पोलीस ठाणी कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-१२-२०२४) :** (१) व (२) राज्यातील कोल्हापूर, ठाणे, नवी मुंबई व पालघर जिल्ह्यांमध्ये पुढील पोलीस ठाणे निर्माण करण्याचे प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयास संबंधित पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून प्राप्त झाले आहेत.
१. पोलीस आयुक्त, ठाणे शहर :-
(१) दिवा पोलीस ठाणे
(२) दापोडे पोलीस ठाणे
(३) मानसरोवर पोलीस ठाणे
(४) काटई पोलीस ठाणे
(५) नेवाळी पोलीस ठाणे
(६) वंजारपट्टी नाका पोलीस ठाणे

२.पोलीस आयुक्त, नवी मुंबई :-
(१) ऐरोली पोलीस ठाणे
(२) उलवे पोलीस ठाणे
(३) करंजाडे पोलीस ठाणे
३. पोलीस अधीक्षक, पालघर :-
(१) कुडूस पोलीस ठाणे
४. पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रामीण) :-१) खर्डी, ता.शहापूर येथे नवीन पोलीस ठाणे
५.पोलीस अधीक्षक, कोल्हापूर :-
(१) सुभाषनगर पोलीस ठाणे
(२) कसबा बावडा पोलीस ठाणे

(३) मजरे कारवे पोलीस ठाणे

(४) कबनुर पोलीस ठाणे

उक्त प्रस्तावांमध्ये त्रुटी आढळून आल्याने, शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक २५/०८/२०२३ च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार सुधारित प्रस्ताव सादर करण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाने संबंधित पोलीस आयुक्त/ पोलीस अधीक्षक कार्यालयांना कळविले आहे. उक्त प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाकडून प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्हा परिषदेच्या इमारतीतील स्लॅब कोसळल्याने कर्मचाऱ्यां ची सुरक्षा धोक्यात आल्याबाबत

**(५) २१७९२ (०५-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा परिषदेच्या इमारतीतील महिला व बालकल्याण विभागाच्या कार्यालयातील स्लॅब कोसळल्याने या इमारतीतील दुसरा व तिसरा मजला धोकादायक झाला असून कर्मचाऱ्यांची सुरक्षा धोक्यात आली असल्याची बाब माहे ऑगस्ट,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे,हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सदर जिल्हा परिषदेच्या इमारतीचे तात्काळ स्ट्रक्चरल ऑडिट करून संपूर्ण इमारतीची नव्याने बांधणी करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२१-०२-२०२५) :** (१) हे, खरे आहे.

(२) प्रस्तुत इमारतीचा माहे मे, २०२४ मध्ये वॉलचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून स्ट्रक्चरल ऑडीट अहवाल प्राप्त झाला असून सदर इमारत वापारण्यास अयोग्य आहे. तथापि, जिल्हा परिषद, सांगली यांच्याकडून प्रस्तुत इमारतीचे अंदाजपत्रक बनविण्याचे काम प्रगतीपथावर असून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर यांसदर्भात प्रचलित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अतितीव्र व तीव्र श्रवणऱ्हास असणाऱ्या विद्यार्थी रूग्णांना कोक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिये करिता आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणेबाबत

**(६) २२२४३ (२७-११-२०२३) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अतितीव्र ते तीव्र श्रवणऱ्हास असलेल्या कर्णबधिरांसाठी कोक्लिअर इम्प्लांट एक वरदान ठरत असून कोक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया केल्यानंतर अशा कर्णबधिरांची श्रवणक्षमता जवळजवळ सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शस्त्रक्रियेनंतर कोक्लिअर इम्प्लांटच्या ॲक्सेसरीज व प्रोसेसर अपडेटकरीता लाखो रूपयांचा खर्च येत असून त्याबाबत शासनाकडून कोणतेच आर्थिक सहाय्य देण्यात येत नसल्यामुळे कोक्लिअर इम्प्लांटची शस्त्रक्रिया झाल्यानंतर संबंधित विद्यार्थी रूग्णांना व त्यांच्या कुटुंबियांवर आर्थिक भार पडत असून सदरचा खर्च हा सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेरचा असल्याने कोक्लिअर इम्प्लांटची शस्त्रक्रिया केलेले बरेचसे विद्यार्थी रूग्ण हे पुढील आवश्यक ॲक्सेसरीज व प्रोसेसर अपडेटपासून वंचित राहतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे सदरहू शस्त्रक्रिया केल्यानंतर तीन वर्षाच्या कालावधीनंतर प्रोसेसर अपडेट करण्यास ५० टक्के आर्थिक सहाय्य देण्यात येत असून देशातील काही राज्यांमध्ये सदरहू शस्त्रक्रियेनंतर आवश्यक ॲक्सेसरीज व प्रोसेसर अपडेटकरीता पूर्णत: आर्थिक सहाय्य मिळते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील अतितीव्र व तीव्र श्रवणऱ्हास असणाऱ्या विद्यार्थी रूग्णांनी राज्यातील शासकीय, निमशासकीय अथवा खाजगी रूग्णालयात कोक्लिअर इम्प्लांटची शस्त्रक्रिया केल्यास त्यांना सदरहू शस्त्रक्रियेकरीता देण्यात येणाऱ्या आर्थिक सहाय्यासोबतच सदरहू शस्त्रक्रियेनंतर उपयुक्त असणाऱ्या ॲक्सेसरीज मोफत अथवा सवलतीच्या दरात देणे आवश्यक असल्याने अशा प्रकारची आर्थिक मदत अथवा सवलत रुग्णांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच यास किती कालावधी लागणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (०८-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

कर्णबधिरता पूर्णपणे सर्व सामान्य होत नाही मात्र श्रवणक्षमता वाढते. ही शस्त्रक्रिया संवादाचे साधन म्हणून काम करते. शस्त्रक्रियेनंतर दिली जाणारी स्पीच आणि लँग्वेज थेरपी आणि श्रवण शाब्दिक थेरपी (Auditory Verbal Therapy) मुलांना आवाज ओळखण्यास मदत करू शकते, ज्याचा उपयोग संवाद साधण्यासाठी आणि शिक्षणाकरीता होतो.

(२) हे खरे नाही.

१. सद्य:स्थितीत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानूसार जन्मत: कानाने ऐकू न येणाऱ्या लहान बालकांवर वय वर्ष २ पर्यंत कोक्लिअर इम्प्लांटच्या शस्त्रक्रिया केली जाते.
२. कोक्लिअर इम्प्लांटच्या शस्त्रक्रियेनंतर ॲक्सेसरीज व प्रोसेसर अपडेटकरीता राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनांनूसार कोणत्याही खर्चाची तरतूद नाही.
३. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये जन्मत: कानाने ऐकु न येणाऱ्या लहान बालकांवर वय वर्ष २ पर्यंत कोक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.
४. केंद्र शासनाच्या दिव्यांग कल्याण विभागाच्या ADIP (Scheme of Assistance to Disabled persons of purchase/Fitting of Aids and Appliances) योजनेंतर्गत वयोवर्ष १ ते ५ पर्यंत कोक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया करण्यात येते.

(३) व (४) केंद्र शासनाच्या दिव्यांग कल्याण विभागाच्या ADIP (Scheme of Assistance to Disabled persons of purchase/Fitting of Aids and Appliances) योजनेंतर्गत मार्गदर्शन सुचनांनुसार कोक्लिअर इम्प्लांटच्या शस्त्रक्रियेनंतर आवश्यक ॲक्सेसरीज व प्रोसेसर अपडेटकरीता रुपये

रुपये २२५००/ पर्यंत मासिक उत्पन्न असणाऱ्या लाभार्थ्यांना पुणर्त: आर्थिक सहाय्य व रुपये २२,५०० ते रुपये ३०,०००/- पर्यंत मासिक उत्पन्न असणाऱ्या लाभार्थ्यांना ५० % आर्थिक सहाय्य करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भटक्या विमुक्त जातीच्या दाखल्यासाठी असलेल्या जाचक अटी रद्द करण्याबाबत

**(७) २२५३९ (०५-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आझाद मैदान (मुंबई) येथे भटक्या विमुक्त (जोशी, गोंधळी, वासुदेव आणि बागडी) समाजातील नागरीकांनी त्यांच्या जातीच्या दाखल्यासाठी असलेल्या जाचक अटी रद्द करण्यासाठी आंदोलन केल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त भटके विमुक्त समाज आपला पारंपारिक व्यवसाय करुन भटकंती करत जीवन जगत असताना त्यांना जातीच्या दाखल्यासाठी १९९६ पूर्वीच्या महसूल पुराव्याची जाचक असलेली अट रद्द करून या नागरिकांना दाखले द्यावे तसेच भटक्या जमातींचा एक प्रतिनिधी मागासवर्ग आयोगावर घेण्याबाबत तसेच निवासासाठी शासकीय पडजमीन अथवा गायरान जमिनी द्याव्यात अशा अन्य मागण्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी भटक्या जमातींना जातीच्या दाखल्यासाठी असलेल्या जाचक अटी रद्द करण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१०-०२-२०२५) :** (१) होय.
(२) होय.
(३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय दिनांक ०१ ऑक्टोबर, २००८ अन्वये, भटक्या व विमुक्त जातीच्या ज्या ठिकाणी वास्तव्य करीत असतील त्या गावच्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाने त्या व्यक्तींच्या वास्तव्य आणि जातीबाबत उपलब्ध कागदोपत्री पुरावे तपासून, गृह चौकशी व तद्नुषंगिक संदर्भ लक्षात घेऊन प्रमाणित केलेले प्रमाणपत्र सादर केल्यास, सक्षम प्राधिकारी यांनी जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी पुरावा म्हणून ग्राह्य मानावे, अशी तरतुद करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुंभारमाट (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथे शासकीय डी-फार्मसी व बी-फार्मसी महाविद्यालय सुरु करण्याबाबत

**(८) २२७०१ (०५-०१-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ११ मधील प्रश्न क्रमांक १६०१० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुंभारमाट, (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील डी.फार्मसी व बी.फार्मसी महाविद्यालय या संस्थेच्या आवारात उपलब्ध असलेल्या शासनाच्या मालकीच्या जागेवर सुरु करण्याचे प्रस्तावित असून तंत्र शिक्षण

संचालनालयामार्फत शासनास सादर करण्यात आलेल्या प्रकल्प अहवालाच्या अनुषंगाने विभागाकडून तपासणी करण्यात येऊन, त्यानुषंगाने संचालनालयामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत असल्याचे, माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्प अहवालाची तपासणी पूर्ण झाली आहे काय, त्यानुषंगाने पुढील कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२८-१०-२०२४) :** (१), (२) व (३) होय.

तंत्र शिक्षण संचालनालयाने दिनांक २६/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास माहिती सादर केलेली आहे.
(४) कोकण विभागात फार्मास्युटिकल पार्क उभारल्यास त्याठिकाणी लागणारे मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने शासकीय तंत्रनिकेतन, मालवण येथे शासकीय डी. फार्मसी व बी. फार्मसी महाविद्यालय सुरु करणे प्रस्तावित करण्यात आले होते. फार्मास्युटिकल पार्क उभारणीबाबतची कार्यवाही उद्योग विभाग, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत करण्यात येते. तथापि, प्रस्तावित फार्मास्युटिकल पार्क उभारणीबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

---

## मुंबई विद्यापीठातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(९) २२८७८ (१४-०६-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठातील कुलसचिव आणि परीक्षा नियंत्रक व इतर पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून विद्यार्थ्यांना होणारा ताण कमी करण्यासाठी दीर्घकाळ प्रभारी असलेल्या कुलसचिव आणि परीक्षा नियंत्रक इ.सारखी पदे त्वरीत भरण्याबाबत विद्यार्थी संघटनांनी दिनांक १२ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास कुलगुरूंना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी मुंबई विद्यापीठातील कुलसचिव व परीक्षा नियंत्रक यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२३-१०-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) कुलसचिव आणि संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ ही दोन पदे आता मुंबई विद्यापीठाकडून भरण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक शहराभोवती द्रुतगती परिक्रमा मार्ग करण्याबाबत

**(१०) २३०८७ (२२-०७-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील वाहन संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने वाहतूक कोंडी वाढत असून सन २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या अनुषंगाने नाशिक शहराभोवती द्रुतगती परिक्रमा मार्ग करण्याचे काम प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त रस्त्याची व्यवहार्य तपासणी आणि सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, नाशिक शहराभोवतीचा द्रुतगतीपरिक्रमा मार्गाचे काम केव्हापर्यंत सुरू होणे अपेक्षीत आहे?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०२-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीत आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालातील निष्कर्षानुसार निधी, निकष व प्राधान्य क्रमानुसार काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

## कोरोना कालावधीत सेवा बजाविताना मृत्यूमुखी पडलेल्या नागपूर महानगरपालिकेच्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(११) २३०९४ (१६-०७-२०२४) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये कोरोना काळात कोविड सेंटरवर कर्तव्यावर असताना तसेच क्वारंटाईन सेंटरवर सफाई कर्मचारी म्हणून सेवा देत असताना ५२ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला, त्यांच्या कुटुंबियांना अद्याप शासनाने घोषित केलेली आर्थिक मदत मिळाली नसल्याची बाब दिनांक ११ एप्रिल, २०२४ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगरविकास विभागाने केंद्र शासनाच्या आरोग्य आणि कल्याण मंत्रालयाच्या दिनांक २८ मार्च, २०२० रोजीच्या आदेशानुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील कर्मचारी कर्तव्य बजावतांना कोरोनाची लागण होऊन मृत्यू झाल्यावर रुपये ५० लाखांचे सानुग्रह अनुदान मंजूर करण्याचा निर्णय दिनांक ४ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सानुग्रह अनुदानाच्या योजनेनुसार राज्यातील अशा प्रकारच्या किती कर्मचाऱ्यांना आतापर्यंत सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले,
(४) असल्यास, शासनाने दिनांक ८ एप्रिल, २०२४ रोजी मा.उच्च न्यायालयात नागपूर महानगर पालिकेनेच सफाई कर्मचाऱ्यांना मदत द्यावी असे शपथपत्र दाखल केले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने घोषित केलेली रुपये ५० लक्ष रक्कम मिळणेबाबत मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांनी मागणी केली असून शासन कर्मचाऱ्यांच्या वारसांना घोषित केलेली रक्कम वर्ग करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०२-२०२५) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

कोरोना काळात कर्तव्यावर असताना मृत्यू पावलेल्या ५४ कर्मचाऱ्यांच्या वारसांना नागपूर

महानगरपालिकेद्वारे सानुग्रह सहाय्याचा लाभ देण्यात आला आहे. यापैकी ४ वारसांना न्यू इंडिया ॲश्युरन्स कंपनीकडून रुपये ५० लक्ष विम्याचा लाभ मिळाला आहे. मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल याचिका क्र. २००४/२०२३ अन्वये दिनांक १२/०४/२०२४ रोजीच्या आदेशानुसार एकूण १६ वारसांना प्रत्येकी रुपये ५० लक्ष देण्यात आले आहेत. महानगरपालिका ठराव क्र. ४७ दि.१५/०२/२०२४ नुसार २७ लाभार्थ्यांना रुपये १० लक्ष प्रत्येकी RTGS द्वारे देण्यात आले आहेत. उर्वरीत ७ वारसदारांना Indemnity Bond सादर न करणे, नातेवाईकांचा आपापसातील वाद, न्यायालयाने लाभ खारीज करणे या कारणास्तव लाभ वितरीत करण्यात आला नाही.

(३) सानुग्रह सहाय्याच्या योजनेंतर्गत राज्यातील महानगरपालिकांमधील ३९८ व नगरपरिषद / नगरपंचायतीमधील १३३ कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

(४) हे खरे आहे.

(५)वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ०४/०८/२०२१ नुसार "अ" वर्ग व "ब" वर्ग महानगरपालिकांनी रुपये ५० लक्ष सानुग्रह सहाय्याची योजना त्यांच्या स्वनिधीमधून राबविण्याबाबतचे निर्देश देण्यात आले होते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे वेतन वाढविणेबाबत

**(१२) २३१३० (२२-०७-२०२४) श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सुनिल शिंदे, श्री.प्रसाद लाड, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अ,ब,क आणि ड वर्गाची सुमारे १२००० हुन जास्त ग्रंथालये कार्यरत असून वर्षानुवर्षे वाचन चळवळीत झोकून काम करणाऱ्या ग्रंथालयांचे अनुदान अत्यंत किरकोळ त्रुटींमुळे प्रलंबित असल्याने व ग्रंथालयाला देण्यात आलेले अनुदान तुटपूंजे असल्याने ग्रंथालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन २० हजारापर्यंतही जात नसल्याने कर्मचाऱ्यांना अनेक आर्थिक समस्येचा सामना करावा लागत असल्याची बाब माहे एप्रिल,२०२४ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकीकडे वाचन चळवळ वाढीस लागावी म्हणून सरकार कोट्यवधी रुपये खर्चून संमेलन विविध कार्यक्रम भरवते परंतु ग्रंथालयामध्ये वर्षानुवर्ष वाचन चळवळीत झोकून देणाऱ्या कर्मचाऱ्यांना पुरेसे वेतन देण्यात येत नसल्याने हे कर्मचारी आपल्या अनेक मूलभूत हक्कापासून वंचित राहत आहेत तसेच अ वर्गाच्या ग्रंथालयाच्या कर्मचाऱ्यांना सेवेच्या अखेरपर्यंत १६ हजार तर ब आणि क वर्ग दर्जाच्या ग्रंथालय कर्मचाऱ्यांना रोजगार हमीपेक्षा कमी वेतन मिळत असून सन २०१२ पासून ग्रंथालयांच्या अनुदानात वाढ करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये नियम, १९७० मधील निकषांमध्ये कालानुरूप सुधारणा करणे आवश्यक असतानाही उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक २१ फेब्रुवारी, २०१२, दिनांक २२ मार्च, २०१३ व दिनांक ७ जून, २०१४ या शासन निर्णयान्वये सन २०१२-१३ पासून शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना दर्जा वर्ग वाढ देणे ही प्रक्रिया स्थगित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

चौकशीच्या अनुषंगाने ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या पगारात ८ पटीने वाढ होणे अपेक्षित असतानाही अ,ब, क आणि ड वर्गातील सर्व ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना किमान मानधनापेक्षाही कमी वेतन मिळत असल्याने शासन या ग्रंथालयातील सर्व कर्मचाऱ्यांना पुरेशे वेतन देण्याच्या अनुषंगाने अनुदानात वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये नियम, १९७० मधील निकषांमध्ये कालानुरूप सुधारणा करण्याबाबत, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०३-०९-२०२४) :** (१) राज्यात ११,१५० शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये असून या ग्रंथालयांचे व्यवस्थापन नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थाकडून पाहिले जाते. नियमातील तरतूदीनुसार अ, ब, क आणि ड वर्गवारीनुसार ग्रंथालयांना त्यांनी केलेल्या खर्चावर आधारीत सहाय्यक परिरक्षण अनुदान शासनाकडून दिले जाते. ग्रंथालयाला मिळणाऱ्या परिरक्षण अनुदानातील ५०% रक्कम कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी खर्च करावी लागतो
(२) अनुदान विषयक नियम तयार झाल्यानंतर सन १९७० पासून वेळोवेळी ग्रंथालयांच्या अनुदानात वाढ करण्यात आली असून सन २०२२-२३ मध्ये ६०% परिरक्षण अनुदानात वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे अनुदान वाढल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या वेतनात सुध्दा वाढ होती.
(३) होय.
(४) ग्रंथालय संघ, कार्यकर्ते, कर्मचारी संघटना एकूणच ग्रंथालय चळवळीतून वारंवार होणाऱ्या मागणीचा विचार करता व कर्मचाऱ्यांच्या मानधनात पुरेशी वाढ होण्याच्या दृष्टीने अनुदानात वाढ व्हावी, यासाठी राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांच्या विद्यमान अनुदान दरात वाढ करण्याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.
(५) महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहायक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री यासाठी मान्यता) नियम, १९७० मध्ये कालानुरुप बदल करण्याची आवश्यकता असल्याने नियमात सुधारणा सुचविण्यासाठी ग्रंथालय संचालनालयांतर्गत समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सुचविल्यानुसार सुधारणा करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उदभवत नाही.

---

## सिडकोने नैना क्षेत्राचे अर्बन डिझाइनिंग मास्टर प्लॅनिंग नियोजनासह प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार न नेमण्याबाबत

**(१३) २३१५७ (१६-०७-२०२४) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिडकोची घरे विकण्यासाठी ७०० कोटी रुपयांची अडत देऊन सिडकोने एजन्सी नियुक्त केली असून नैना क्षेत्राचे अर्बन डिझाइनिंग मास्टर प्लॅनिंग नियोजन करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्यासाठी ४२५ कोटी रुपयांच्या खर्चास माहे जानेवारी, २०२४ मध्ये मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अर्बन डिझायनिंगची आवश्यकता नाही, त्यामुळे निविदा रद्द करण्यात यावी अशी मागणी सिडको युनियनचे अध्यक्ष यांनी सिडकोकडे माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-०३-२०२५) :** (१) व (२) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ भोवतीचा परिसर (नैना NAINA-Navi Mumabi Airport Influence Notified Area)-नैना प्रकल्पाचा सूनियोजीत विकासादरम्यान तसेच नवी मुंबई विकास कामाच्या आढळलेल्या त्रुटी विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी व वाहतूक कोंडी टाळून सुरळीत वाहतुकीसाठी, अभियांत्रिकी आणि वाहतूक क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करुन विकास करण्यासाठी निविदा समितीच्या शिफारशीनुसार सिडको संचालक मंडळाचा ठराव क्र.१२८४२, दिनांक १०/०१/२०२४ अन्वये मे. हितेन सेठी अणि असोसिएट्स यांनी सादर केलेल्या सर्वात कमी बोलीच्या रुपये ४२५ कोटीच्या देयकास प्रकल्पाची वाजविता व कामाची निवड लक्षात घेऊन मान्यता देण्यात आली आहे. "प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार" शुल्कापोटी असल्यास कंत्राटदाराने प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या रकमेच्या सुमारे २.९६% प्रमाणे कामाच्या प्रगतीनुसार टप्प्याटप्प्याने रक्कम सिडकोमार्फत अदा करण्यात येणार आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील रेशन दुकानदारांच्या मागण्यांबाबत

**(१४) २३३७७ (२२-०७-२०२४) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील रेशन दुकानदारांनी त्यांना उत्पन्न मर्यादा (मार्जिन इन्कम गॅरन्टी) पन्नास हजार करावी, मार्जिन इन्कम ३०० रुपये करावा, टू जी ऐवजी फोर जी मशिन द्यावी, इत्यादी मागण्यांसाठी दिनांक १ जानेवारी, २०२४ रोजीपासून बेमुदत संप पुकारला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेऊन रेशन दुकानदारांच्या मागण्यांची पूर्तता करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२०-०८-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघ, पुणे यांनी त्यांच्या दिनांक १७/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये दिनांक १ जानेवारी, २०२४ पासून राज्यातील सर्व स्वस्त धान्य दुकाने बेमुदत बंद बाबतचा संप पुकारला होता.
(२) मा.सचिव, अ.ना.पु व ग्रा.सं.वि यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०३/०१/२०२४ रोजी दूरचित्रवाणीद्वारे

बैठक आयोजित करण्यात आली होती व रास्त भाव दुकानदारांच्या कमिशनमध्ये वाढ, रास्त भाव दुकानांच्या व्यवस्थापना संदर्भात नव्याने स्वतंत्र सर्वकष धोरण व संघटनेच्या इतर विविध मागण्यांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली.

अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघ, पुणे यांच्याकडून दिनांक १०/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ०१ जानेवारी, २०२४ पासून पुकारलेला बेमुदत संप स्थगित करीत असल्याबाबत कळविण्यात आले.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरातील (भांडुप (प.) नाहूर रेल्वे स्टेशन समोरील जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत

**(१५) २३५४० (२२-०७-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील भांडुप -पश्चिम (ता.कुर्ला) नाहूर रेल्वे स्टेशन समोरील सर्वे क्रमांक २२२/२, २२३/१, २२३/२, २२३/३, २२३/४, २२३/५, २२३/६, २२३/७, २२३/८, २२३ /९, २२३/१०, २२३/११, २२३/१२ या वडिलोपार्जित असलेल्या जागेची खोटी कागदपत्रे वापरून मे. मॅरेथॉन रियालिटी प्रा.लि. यांनी फसवणूक केल्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.उपमुख्यमंत्री महोदयांना दिले असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले वा चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१४-०२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदरबाबत तक्रारदार श्री.परशुराम भोईर, रा. भांडुप (पु.), मुंबई यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सीसीटीएनएस गु.नों.क्र. ४११/२०२४ कलम ४२०, ४०६,४०९,४५२,१८८,१२० (ब), ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणातील गाळ काढण्याबाबत

**(१६) २३७९७ (२२-०७-२०२४) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उजनी धरण हे महाराष्ट्रातील एक मोठे धरण असून उजनी धरणावर सोलापूर सह इतर जिल्ह्यातील पिण्याचे पाणी औद्योगिक व शेती सिंचनासाठी अनेक प्रकल्प अवलंबून आहेत व अजून काही प्रकल्प प्रस्तावित आहेत. हे खरे आहे काय,

(२) असल्यास,यंदा उजनी धरण फक्त 66% भरले असून धरणाची पाणी पातळी - 40% झाली असून सध्या उजनी धरणात अंदाजे 14 टीएमसी गाळ व वाळू असल्याचा अहवाल दिल्लीच्या तेजो विकास या

संस्थेने व शासनाच्या मेरी संस्थेने दिला असल्याचे माहे मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे,
(३) असल्यास, यावर्षी कमी पावसामुळे १५ मोठी धरणे कोरडी पडली असल्यामुळे राज्यातील ८० धरणांमध्ये ५० टक्क्यापेक्षा कमी पाणीसाठा शिल्लक राहिल्याने यावर्षी सोलापूर जिल्ह्यातील नागरीकांना पाणी टंचाईस सामोरे जावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उजनी धरणातील गाळाबाबतचा अहवाल समितीने जलसंपदा विभागास दिला आहे काय,तसेच गाळ काढण्याचे टेंडर किती दिवसांत काढणार येणार आहे,
(५) असल्यास,शासनाने उपलब्ध जलसाठयांचे नियोजन तातडीने करण्याबाबत तसेच दरवर्षी पाणी टंचाई निर्माण होणार नाही याबाबत व उजनी धरणातील गाळ काढण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०३-२०२५) :**
(१) होय, हे खरे आहे.

भीमा (उजनी) प्रकल्पांतर्गत एकूण 10 उपसा सिंचन योजना प्रगतीपथावर असून वडापूर येथून भीमा-सीना जोड कालवा योजना प्रस्तावित आहे. भीमा (उजनी) प्रकल्पाच्या सुधारित फेर जलनियोजनास दि.01.10.2024 रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(२) होय, अंशतः खरे आहे.
(३) सन 2023-24 मधील पाणी वापराचे नियोजन कालवा सल्लागार समितीच्या निर्णयानूसार रब्बी हंगामाअखेर शेतीसाठी पाणी पुरवठा करण्यात आला असून, दि.30.06.2024 अखेर पिण्यासाठी पुरेसा पाणीसाठा आरक्षित करण्यात आला होता. सन 2024 च्या पावसाळयात उजनी धरणात 100 % पाणीसाठा झालेला होता. त्यामुळे पाणी टंचाईचा प्रश्न उद्धवत नाही.
(४) राज्यातील मोठ्या पाटबंधारे प्रकल्पातून गाळ व गाळमिश्रीत वाळू/रेती निष्कासनाबाबतचे सुधारीत धोरण दि.03/08/2018 रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आले होते. यामध्ये प्रायोगिक तत्वावर निवड केलेल्या 5 मोठ्या पाटबंधारे प्रकल्पामध्ये उजनी या धरणाचाही समावेश होता. या कार्यक्रमात निविदा कागदपत्रांमध्ये काही बाबतीत संदिग्धता व आंतरविरोध असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याने, या संदर्भात मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्याने सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आल्या होत्या.

तद्नंतर सदर धोरणानुसार निवडलेल्या मोठ्या पाटबंधारे प्रकल्पातील गाळ निष्कासनासाठी प्रारूप ई-निविदा कागदपत्रे सुधारीत करण्यासाठी दि.18/07/2022 रोजीच्या शासन निर्णयाद्वारे नव्याने समिती गठित करण्यात आली होती. समितीने अहवाल तसेच जलाशयातील गाळ निष्कासनाकरिता मानक निविदा कागदपत्राचे प्रारूप (SBD) सादर केले आहे. समितीने सादर केलेला अहवाल व जलाशयातील गाळ निष्कासनाकरिता मानक निविदा कागदपत्राच्या (SBD) अनुषंगाने सर्व महामंडळाकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत. महामंडळांच्या अहवालाच्या अनुषंगाने अभिप्राय विचारात घेवून गाळ निष्कासनाचे सुधारित धोरण सुनिश्चित करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाकडून रायगड जिल्ह्यासाठी स्वतंत्र उपकेंद्र सुरू करण्याबाबत

**(१७) २३८१९ (२२-०७-२०२४) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाशी संलग्न मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये सुमारे ९०० पेक्षा अधिक महाविद्यालये संलग्न असून मुंबई विद्यापीठात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना कोणत्याही कामासाठी मुंबईमध्ये यावे लागू नये यासाठी मुंबई व उपनगर या जिल्ह्यांना वगळता प्रत्येक जिल्ह्यामध्ये मुंबई विद्यापीठाकडून उपकेंद्र सुरू केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हयासाठी-पनवेल किंवा पेण या भागात स्वतंत्र उपकेंद्र सुरु करावे अशी मागणी करण्यात आली होती व या मागणीची मा.मुख्यमंत्री यांनी दखल घेऊन यासंदर्भातील प्रस्ताव उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सादर करावा अशा सूचना केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यासाठी स्वतंत्र उपकेंद्र सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला असून उक्त प्रस्तवाच्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यात उपकेंद्र सुरू करण्याच्या दृष्टीने शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२३-१०-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

आज मितीस मुंबई विद्यापीठाचे रत्नागिरी, सिंधुगुर्ग, आणि ठाणे येथे उपपरिसरे कार्यान्वित करण्यात आली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

यासंदर्भातील विभागास कोणत्याही सुचना प्राप्त नाहीत. त्याचप्रमाणे विद्यापीठास असा कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जलसंपदा विभागातील अपात्र अधिकाऱ्यांना पदोन्नती दिल्याबाबत

**(१८) २४१९९ (२२-०७-२०२४) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांना सेवा नियम १९८३ मधील तरतुदीनुसार पदोन्नत्या दिल्या जातात, त्यासंदर्भात शासनाने दिनांक १ जुलै, २०२० रोजी शासन निर्णय निर्गमित केला असून त्यानुसार कार्यकारी व अकार्यकारी पदावर प्रत्येकी तीन वर्षाची सेवा ही अनिवार्य अट टाकण्यांत आली असताना, जवळपास ८ ते १० अधिकारी हे त्या अटीनुसार पात्र नसतानाही त्यांना पदोन्नती देऊन पात्र अधिकाऱ्यांवर अन्याय होत असल्याचे दिनांक १२ मे, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांमार्फत मा.लोकायुक्त यांच्याकडे तक्रार केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने पात्र अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०१-२०२५) :** (१) नाही. हे खरे नाही.

जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार पदोन्नती देण्याची कार्यवाही करण्यात येते. अधीक्षक अभियंता (स्थापत्य) संवर्गाचे सेवाप्रवेश नियम, दिनांक ०१/०३/१९९६ रोजी अधिसूचित करण्यात आले असून, त्यामध्ये अधिसूचना दिनांक ०७/०४/२००८ व शासन निर्णय दिनांक २५/०७/२०१४ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. तसेच, सदरहू सेवाप्रवेश नियमात केलेल्या तरतूदीनुसार पदोन्नतीकरीता सेवेचा विहित कालावधी पूर्ण करण्याबाबतच्या सूचना परिपत्रक, दिनांक ०१/०७/२०२० अन्वये देण्यात आल्या आहेत. सदर सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार व सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या मान्यतेनुसार अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदावर पदोन्नती देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(२) नाही.

मा.लोक आयुक्त यांच्याकडे यासंदर्भात तक्रार प्राप्त झाल्याबाबत त्या कार्यालयाचे पत्र शासनास प्राप्त झालेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## समृध्दी महामार्गाचे विस्तारीकरण करण्याकरीता निविदा प्रक्रियेबाबत

**(१९) २४२८७ (२२-०७-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) समृध्दी महामार्गाचा नागपूर-चंद्रपूर, भंडारा- गडचिरोली आणि नागपूर- गोंदिया असा विस्तार करण्यात येणार असून या तीनही महामार्गाच्या कामासाठी एमएसआरडीसीने निविदा मागविल्या आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समृध्दी महामार्गाचे विस्तारीकरण करण्याकरीता नागपूर-चंद्रपूरकरीता २२, भंडारा-गडचिरोलीकरीता ४, नागपूर-गोंदिया करीता २०, अशा एकूण ४६ निविदा सादर झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सर्व निविदा प्रक्रियेची सद्य:स्थिती काय आहे, तसेच या प्रकल्पातील बांधकामासाठी किती कालावधी ठरविण्यात आला आहे व कोणकोणत्या कंपन्यांना या बांधकामाचे कंत्राट देण्यात आले आहे ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०२-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

(३) सदर प्राप्त निविदांना महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली असून लवकरच कंत्राटदारांची नियुक्ती करणे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाकरीता करारनाम्यात प्रकल्पाचा कालावधी ३० महिने निश्चित करण्यात आला आहे.

---

## गडचिरोली, नंदुरबारसह आदिवासी बहुल जिल्ह्यात मोह फुलापासून इथेनॉल निर्मितीची शक्यता पडताळण्याबाबत

**(२०) २४२९३ (२२-०७-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गडचिरोली, नंदुरबारसह अनेक आदिवासी बहुल जिल्हयांचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वनांनी व्यापलेले असून या जिल्ह्यातील आदिवासी उदरनिर्वाहासाठी मोहफुले वेचण्याचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यात दारू विक्री व निर्मितीस बंदी असल्यामुळे मोह फुलांपासून इथेनॉल निर्मितीची चाचणी करण्याचे आश्वासन मा.मंत्री, गृह यांनी डिसेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आश्वासनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (३१-०१-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

शासन आदेश दिनांक १४/०९/१९९२ अन्वये गडचिरोली जिल्ह्यात किरकोळ व ठोक मद्यविक्री अनुज्ञाप्ती मंजूरीस प्रतिबंध करण्यात आलेला आहे. तथापि, सदर आदेशानुसार मद्य/मद्यार्क निर्मिती प्रकल्पास मंजूरी देण्याबाबत बंधन नाही.

(३) मोह फुलांपासून मद्यार्क उत्पादन करता येते. तसेच, सदर मद्यार्काचे निर्जलीकरण करुन त्यापासून इथेनॉल निर्मिती करता येते.

सद्य:स्थितीत मे. एल. टी. बी. ब्रेव्हरेजस, गडचिरोली या घटकास मौजे कोटगल, ता.जि.गडचिरोली येथे मोहाफुलांपासून मद्यार्क निर्मिती करण्याकरीता ‘‘नमुना-आय’’ अनुज्ञाप्तीसाठी इरादापत्र मंजूर करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.